# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई

**SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST. BEED**

## ग्रंथालय विभाग

जाक्र. स्वारातीग्राशावैमअं/ग्रंथा/नि.बांधणी/दरपत्रक/ 10675 to 10678 /२०२१ दिनांक: 02/12/21

प्रती,
यादी पाठीमागे

विषय: नियतकालिके बांधणी कामाचे दरपत्रकाबाबत....

या महाविद्यालयाचे ग्रंथालयातील नियतकालिकांची बांधणी करण्याकरिता मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. **आपले दरपत्रक या कार्यालयामध्ये दिनांक 15 / 12 / 2021 पर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे. मोहोरबंद पाकीटावर ग्रंथालयातील नियतकालिकांच्या बांधणी कामाकरिता दरपत्रके असे नमूद करावे.**

**बांधणी कामाचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.**

१. नियतकालिकांची बांधणी स्वीकृत नमून्यानुसार (सँपल कॉपी) असणे आवश्यक आहे.नमुना बांधणी करण्याकरिता आवश्यक वाटल्यास या महाविद्यालयाचे ग्रंथालयातील एक सुटा खंड मिळेल. सँपल कॉपीचा बांधणी खर्च मिळणार नाही, तसेच बांधणी कामाचा नमुना सादर करताना बांधणी साहित्याचा नमूना सादर करावा लागेल. अन्यथा दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

२. कमावलेली चामडी खंडाच्या कण्यावर आणि कोपाऱ्यावर लावून दोन्ही बाजूच्या जाड पुठ्ठयावर एक-एक इंच पुढे वाढवली पाहिजे. तसेच काळ्या रंगाचे उच्च प्रतीचे जाड पुठ्ठयावर दोन्ही बाजूस लावून कण्यावर ग्रंथालय विभागाने दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव, नियतकालिकाचे नाव, वर्ष, महिना, खंड क्रमांक, अंक क्रमांक आणि असल्यास भाग इत्यादी माहिती सोनेरी अक्षरात ठळकपणे आणि सहज वाचता येईल अशा रीतीने छापणे आवश्यक आहे.

३. शिवण: विभाग बांधणी (Sectional Binding) वक्राकृती करणे आवश्यक आहे. बांधणी शिलाईसाठी चांगला मजबूत दोरा वापरावा. प्रत्येक विभागास टाके घालून दुसऱ्या विभागास जोडावे, नंतर शिवण कामाचे चौकटीला सुतळी किंवा फित ताण देण्यासाठी वापरावे. शिवण झाल्यावर सुतळी किंवा फितीची टाके दोन्ही बाजूला चांगले मजबूत पातळ कापड वापरावे. तसेच पुठ्ठयाच्या आतील बाजूला चांगला आणि उच्च प्रतीचा कागद चिकटवावा.

४. बांधणी समाधानकारक न वाटल्यास पुनर्बांधणी विनामूल्य करून देणे आपणावर बंधनकारक राहील.

५. बांधणी कामासाठी देण्यात येणारे नियतकालिकांची बांधणी काम चाळीस दिवसात पूर्ण करून देणे बंधनकारक राहील.

६. बांधणी कामासाठी देण्यात येणारे खंड, खंडातील पाने गहाळ किंवा खराब झाल्यास त्याची भरपाई आपणास द्यावी लागेल. त्याबाबत रु. 100.00 च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.

७. प्रतेक नियतकालिकांचे खंडातील अंक आणि पृष्ठे अनुक्रमांकाप्रमाणे लावून खंडाच्या सुरूवातीला नियतकालिकांच्या नावाचे पृष्ठ, अनुक्रमणिका, क्रमिक पृष्ठे आणि शेवटी इंडेक्स याप्रमाणे बांधणी करणे आवश्यक आहे.

८. बांधणी करिता नियतकालिके ने-आणण्याची जबाबदारी आपणावर राहील, त्याबाबत कुठलाही खर्च दिला जाणार नाही.

९. आपले दर स्वीकारल्यास ते सहा महिन्यासाठी ग्राह्य धरण्यात येतील.बांधणीचा दर हा प्रती नगाप्रमाणे अंकात आणि अक्षरात स्पष्टपणे लिहावा.

या कार्यालयाने बांधणी काम किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

अधिष्ठाता
स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै. महाविद्यालय,
अंबाजोगाई

6/12/21
डॉ. ओव्हळ आर.एम.

1. नदीम स्क्रीन अँड ओफसेट प्रिंटर्स,
   सदर बाजार नाका, जेल समोर,
   अंबाजोगाई
2. लक्ष्मीनारायण प्रिंटिंग प्रेस,
   मंडी बाजार, अंबाजोगाई
3. मयूर स्क्रीन अँड डिजिटल वर्क्स,
   मेडिकल कॉलेज रोड, अंबाजोगाई
4. लॉ बुक बाईडिंग,
   मेडिकल कॉलेज, रोड, अंबाजोगाई

6/12/24
डॉ. ओ... आर. ...